# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, 6 वा माळा,
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-400001
Email–gardendept.nmc@gmail.com


क्रमांक :- NMC/OWL/GRDN/2025-26/2370 दिनांक :- 16 /04/2025

प्रति,

श्री. प्र. ना. प्रागृत,
अधिक्षक अभियंता,
म.रा.पा.सु.वि. महामंडळ मर्यादित, नागपूर,
A1/A2, निवासस्थाने, रविनगर शासकीय वसाहत,
तेलंगखेडी रोड, नागपूर

विषय :- सिव्हील लाईन्स, नागपूर येथील विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच इतर शासकीय कार्यालयाच्या इमारतीचे एकत्रित प्रस्तावित बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडांबाबत.

संदर्भ :- 1) आपले कार्यालयीन पत्र जा. क्र. अ.अ. (नागपूर)/Col-Off/2024/100 दिनांक 09.10.2024 चे या कार्यालयास प्राप्त दिनांक 10.10.2024 चे पत्रान्वये.

2) कार्यालयास प्राप्त कार्यकारी अभियंता, म. रा.पा. सु. वि. महामंडळ मर्या., नागपूर यांचे दिनांक 27.02.2025 चे या कार्यालयास प्राप्त दिनांक 05.03.2025 चे पत्र.

वरील पत्रान्वये मोक्यावर जाऊन झाडाची/ झाडांची पाहणी करून झाडाच्या/झाडांच्या स्थितीचे निरीक्षण केले असता –

**मा. प्रशासक तथा अध्यक्ष, वृक्ष प्रधिकरण समिती, म.न.पा. नागपूर यांनी दिनांक** 28.03.2025 **रोजीच्या सभेत दिलेल्या मंजुरी अन्वये,** आपणास खालील झाडे कापणी करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

**सिव्हील लाईन्स, नागपूर येथील विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच इतर शासकीय कार्यालय इमारतीच्या एकत्रित प्रस्तावित बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरिटेज) अशोका-1, आंबा-2, कडूनिम-4, करंजी-1, गुलमोहर-3, चिचवा-2, निलगिरी-1, पेल्ट्राफार्म-1 व नॉन हेरीटेज अशोका-4, कडूनिम-6, चिचवा-1, काटसावर-1, आडजात-1, सुबाभूळ-1, पेल्ट्राफार्म-5, सप्तपर्णी-1 व अशी एकूण (15+20=35) 35 नग झाडास जमिनीपासून कापणी करण्याची व नॉन हेरीटेज एक पिंपळ झाडास प्रत्यारोपण करण्याची आपणास परवानगी देण्यात येत आहे.**

1. आपणास परवानगी पत्रात उल्लेखलेल्या झाडाव्यतिरिक्त इतर प्रजातीची झाडे / झाडांच्या फांद्या छाटणी/कापणी करण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.
2. आपणास झाड/झाडे/झाडांच्या कापणी /फांद्या स्वखर्चाने व स्वतःच्या जबाबदारीवर कापणी/छाटणी कराव्या लागतील. झाड/झाडे/ कापणी करतांना रहदारीला अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.
3. **तोडण्यात येणाऱ्या 36 नग झाडाऐवजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, जुलै 16, 2021/आषाढ 25 शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट–कलम (4) (ब) अन्वये तोडण्यात येणाऱ्या त्याच जातीची किंवा इतर कोणत्याही मूळ जातीची तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजित केलेल्या वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान सहा फुट इतक्या उंचीची 1735 नग नविन झाडांची लागवड करावी. पोट-कलम (5अ) अन्वये लागवड करण्यात येणारी झाडे आपणास कमीत कमी सात वर्षाच्या कालावधी करिता जगवावी लागेल. या कालावधीत झाडे न जगल्यास तितक्याच संख्येतील झाडांची लागवड करून त्याची हानीपुर्ती (भरपाई) करण्यात यावी. तसेच लागवड करण्यात आलेल्या झाडाचा फोटोसह अहवाल दर सहा महिन्यात कार्यालयास सादर करावा.**
4. सदर परवानगी पत्रानुसार व नमूद केलेल्या अटीनुसार झाड/झाडे/झाडांच्या फांद्या छाटणी/कापणी कराव्या लागतील अन्यथा महाराष्ट्र (शहरी क्षेत्र) वृक्षजतन (सुधारित) अधिनियम 1975 अन्वये आपल्यावर कार्यवाही करण्यात येईल.
5. **वृक्ष तोडण्याची परवानगी दिल्यापासून 15 दिवसानंतरच वृक्ष तोडण्यात यावे.**
6. वृक्ष प्रत्यारोपण (Transplant) करण्याकरिता तांत्रिक सल्ला आवश्यक असल्यास उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, म.न.पा. नागपूर ला संपर्क साधावा.
7. परवानगी देऊनही झाडास कापणी किंवा झाडाच्या फांद्या न कापणी केल्यास झाड किंवा झाडाची फांदी पडून जीव व वित्तहानी झाल्यास सर्वस्वी जवाबदारी आपली राहील. कृपया याची नोंद घ्यावी.
9. तोडण्यात येणाऱ्या 36 नग झाडाच्या मोबदल्यात पर्यायी नविन सावलीची 1735 नग वृक्ष म.न.पा. हद्दीत लागवड करून छायाचित्रासह नियोजन आराखडा 30 दिवसाच्या आत या कार्यालयात सादर करावे.

टिप :- अ) झाडे तोडण्याकरिता महानगरपालिकेचे अधिकृत ठेकेदार नसून कोणत्याही ठेकेदारास झाडे तोडण्याचा परवाना दिलेला नाही.

Sr. Engg HCPL
9179272694

वृक्ष संवर्धक
नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी :- वनपरिक्षेत्र सेमिनरी हिल्स, नागपूर यांना माहितीकरिता सादर.